माहिती अधिकार

महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालय,
कोंढवा-येवलेवाडी, पुणे महानगरपालिका,
कार्यालयाचा पत्ता- जे.एस.पी.एम.बिल्डींग,
सावंत कॉर्नर, कात्रज, पुणे-४११०४६
कार्यालयाचा संपर्क क्र. :- ०२०-२५५०८८००
ई-मेल:- kondhwa@punecorporation.org
विस्तारित क्र.:- ०२०-२५५०८८००
जावक क्र. :- १९९६ दिनांक:- ११/१२/२०२५

अपिल प्राधिकारी तथा महा.सहा.आयुक्त, कोंढवा-येवलेवाडी पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय

१. अपिलार्थी
श्री. श्रीनाथ भाऊ चव्हाण
५६ तळजाई वसाहत. सहकारनगर क्र. १
पुणे-४११००९ (उकिरंडे रेशनिंग दुकानामागे)
संपर्क:- ७०३८२०३७३७

२. श्री.राजू दुल्लम
जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ आरोग्य निरीक्षक
कोंढवा- येवलेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका.

अपिलार्थी श्री. श्रीनाथ भाऊ चव्हाण
विरुद्ध
जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ आरोग्य निरीक्षक पुणे महानगरपालिका.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) अन्वये प्रथम अपिल

माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत अपिलार्थी श्री. श्रीनाथ भाऊ चव्हाण यांनी दि. २८/११/२०२५ रोजी वरिष्ठ आरोग्य निरीक्षक तथा जन माहिती अधिकारी महापालिका सहाय्यक आयुक्त कोंढवा येवलेवाडी क्षेत्रीय कार्यालय यांचेकडे अर्ज करून माहितीची मागणी केलेली आहे.

माहिती अधिकार अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकाऱ्याने उपलब्ध करून दिलेली माहिती व इतर पत्र व्यवहार संबधीची माहिती.

माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील				
माहिती अधिकारांतर्गत अर्ज सादर केल्याचा आवक क्र.व दिनांक	माहिती उपलब्ध करून द्यावयाचा अंतिम दिनांक	अर्जदारास उत्तर पाठविल्याचा जावक क्र. व दिनांक	अर्जदाराने शुल्क भरल्याचा दिनांक	अर्जदारास माहिती दिल्याचा दिनांक
आ.क्र. ८४९० दि.२८/११/२०२५	दि.२८/१२/२०२५	जा.क्र. ५६०५ दि.२२/१२/२०२५	-	-

प्रथम अपिल अर्ज दाखल करण्याचे कारण :-

१) माहिती अधिकार २००५ नुसार दि. २८/११/२०२५ रोजी कार्यालयात प्रत्यक्ष हजर राहून लेखी अर्ज सादर केला आहे. यात बीडब्ल्युजी प्रकल्पांबाबतची मुद्दा क्र. १ ते २ ची माहितीची मागणी केली आहे. तथापी जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे कार्यालयीन पत्र जा.क्र. ७६०५ दि. २२/१२/२०२५ रोजी मुद्दा १ची माहिती र.रु. १६/- भरल्यानंतर दिली आहे. तथापी मुद्दा क्र. २ ची माहिती दिली नाही. जन माहिती अधिकारी श्री. दुल्लम यांचे सदर पत्रात सोबत माहिती जोडली आहे असे लबाडीने नमूद करून अर्जदार यांची फसवणूक केली आहे.

२) सदर जन माहिती अधिकारी यांनी कलम ७ (१) मधील तरतुदींचा भंग केला आहे.

३) सदरहू वरील जन अधिकारी अधिकाऱ्यांनी माहिती देण्याबाबत जाणिपूर्वक टाळाटाळ केली आहे अशी माझी धारणा झाली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण माहिती दिली आहे. त्यामुळे अतिशय व्यथित होवून प्रथम अपिल करावे लागत आहे. मा. अधिकार अधिनियम ७ (६) नुसार सत्वर मिळावी ही विनंती.

प्रथम अपिल अर्जाचा तपशिल				
प्रथम अपिल अर्ज दाखल करावयाचा अंतिम दिनांक	प्रथम अपिल दाखल केल्याचा दिनांक	प्रथम अपिल अर्ज मुदतीत दाखल केला आहे का?	प्रथम अपिलाच्या विलंबाबाबत निवेदन दिले आहे का?	प्रथम अपिल सुनावणी सूचना पाठविल्याचा जावक क्र. व दिनांक
दि.१२/०१/२०२६	आ.क्र. १००७३ दि.०९/०१/२०२६	होय	-	जा.क्र. ८९२१ दि.०५/०२/२०२६

प्रथम अपिल सुनावणी दिनांक व वेळ:- ०६.०२.२०२६ रोजी दुपारी ०४.१५ वाजता
सुनावणीस अपिलकर्ता :- उपस्थित
सुनावणीस जन माहिती अधिकारी :- उपस्थित

विवेचन

माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत माहिती अधिकार अर्जावरील सुनावणी मध्ये अपिलार्थी हे उपस्थित होते तसेच श्री. राजू दुल्लम जनमाहिती अधिकारी तथा वरिष्ठ आरोग्य निरीक्षक उपस्थित होते. माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत कलम ६ (१) अन्वये केलेल्या अर्जानुसार नमूद माहितीचा तपशील मध्ये विचारणा केली असता मुद्दा क्र. २ ची माहिती अपिलार्थीस मिळाली नसल्याचे अपिलार्थी यांचे म्हणणे आहे. तद्नुषंगाने जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ आरोग्य निरीक्षक यांनी मुद्दा क्र. २ ची माहिती निरंक असल्याने मुद्दा क्र. २ ची माहिती उपलब्ध करून देणे शक्य नसल्याचे नमूद केले आहे.

आदेश

मा.महापालिका सहाय्यक आयुक्त, कोंढवा येवलेवाडी कार्यालय यांनी आदेशित केलेनुसार जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ आरोग्य निरीक्षक यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत प्राप्त झालेल्या मूळ अर्जात विचारणा केलेनुसार सदर अर्जाच्या अनुषंगाने केलेल्या कारवाईची विभागाकडे उपलब्ध माहिती निरंक आहे.

सबब सदरचे अपिल निकाली काढण्यात येत आहे.

(सुचिता पानसरे)
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
महा.सहा.आयुक्त
कोंढवा येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालय
पुणे महानगरपालिका

दिनांक:-
ठिकाण:-पुणे

टीप:- १) सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास माहिती अधिकार अधिनियम कलम १९ (३) अन्वये निर्णय प्राप्त झाल्यापासून ९० दिवसांच्या आत मा. आयुक्त राज्य माहिती आयोग, नवीन प्रशासकीय इमारत, विधानभवन समोर पुणे-४११००१ यांचेकडे द्वितीय अपिल करता येईल.
२) या आदेशाची प्रत पुणे महानगरपालिकेच्या www.punecorporation.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.